# कार्यालयीन सूचना

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७३ व्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण समारंभ गुरुवार दिनांक २६ जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ८.०० वाजता मा. प्रा. डॉ. विजय लक्ष्मीनारायण माहेश्वरी, कुलगुरू, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या हस्ते उमविनगर येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

जळगाव शहरातील कबचौउमवि अधिकार मंडळाचे सन्माननीय सदस्य तसेच जळगाव शहरातील संलग्नित महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त संस्थांचे मा. संचालक यांना विनंती करण्यात येते की, आपण उपरोक्त कार्यक्रमास उपस्थित राहावे.

यावेळी कबचौउमविच्या सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुखांना विनंती की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावर उपरोक्त कार्यक्रमास अगत्याने उपस्थित राहण्याचे निर्देश द्यावेत. सर्वांनी ध्वजारोहन समारंभासाठी सकाळी ७.५० वाजता विद्यापीठाच्या प्रशाकीय भवनासमोर उपस्थित रहावे.

स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक, शहिद जवानांच्या पत्नींना व आई-वडिल यांना या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात येत आहे. तसेच अधिकाधिक नागरिकांना हा सोहळा घरबसल्या पहाता यावा यासाठी सदर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण विद्यापीठ संकेतस्थळावर करण्यात येईल.

**टीप:-** सर्व शैक्षणिक / प्रशाळांचे व प्रशासकीय विभागातील मा. विभाग प्रमुख /नियंत्रक अधिकारी / मा. संचालक यांना विनंती की, आपल्या विभागातील हजेरी पत्रक (मस्टर) **दि. २५ जानेवारी, २०२३ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत प्रशासन विभागात जमा करावे.**

(डॉ. विनोद प्र. पाटील)
**कुलसचिव**

जा.क्र. : कबचौउमवि/०३/सा.प्र./प्रजासत्ताक दिन/०४/२०२३, दिनांक : १९/०१/२०२३

**प्रति,**

१) विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणावरील सर्व मा. सन्माननीय सदस्य
२) मा. विभाग प्रमुख/संचालक सर्व शैक्षणिक/ प्रशासकिय विभाग, कबचौउमवि,जळगाव.
३) मा. प्राचार्य केंद्रीय विद्यालय, उमविनगर, कबचौउमवि, जळगाव.

**प्रतिलिपी:-**

१) कार्यकारी अभियंता- व्यासपीठ, बैठक व ध्वनीक्षेपण व्यवस्था करावी.
२) क्रीडा संचालक - ध्वजवंदनाची पूर्व तयारी इ. व्यवस्था करावी.
३) जनसंपर्क अधिकारी - छायाचित्रण व प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी.
४) विद्यापीठ उप अभियंता, बांधकाम विभाग- ध्वजस्तंभ व मंच रंगरंगोटी व्यवस्था करावी.
५) उद्यान अधिक्षक, (कंत्राटी),उद्यान विभाग, साफ सफाई रंगरंगोटी, पताका, कुंड्या, साज सजावट इ. व्यवस्था करावी.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव-४२५००१